जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - १२० दिनांक -१९/०२/२०२५**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर

## गुन्हे अभिलेखावरील तडीपार आरोपीकडुन ०१ दुचाकी गाडी जप्त

मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे, पुणे शहर यांनी ऑल आऊट / कोंबिंग ऑपरेशन राबवुन कारवाई करणेबाबत सांगितले होते. त्याअनुषंगाने दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १ कडील सपोनि प्रविण काळुखे, स्टाफ असे पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत गस्त करीत असताना गस्ती दरम्यान स्टाफमधील **पोलीस अंमलदार अमित गद्रे व महेश पाटील** यांना त्यांचे गोपनिय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, चतु:श्रुंगी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील व सध्या तडीपार असलेला इसम नामे सोहम प्रकाश डोंगरे, सध्या रा. गणराज सहकारी गृहरचना सहकारी संस्था मर्यादित बिल्डींग, फ्लॅट नं २, विटभट्टी शेजारी, पाषाण, पुणे व मुळ रा. स.नं. ०१, पाषाण भाजी मंडई समोर, सहानी इलेक्ट्रॉनिक दुकानासमोर, सावकार चाळ, संभाजी चौक, पाषाण गाव, पुणे हा त्याचे सध्या राहते घरी येणार असले बाबतची खात्रीशीर बातमी प्राप्त झाली होती.

वरील नमुद बातमीचे अनुषंगाने नमुद अधिकारी व स्टाफ असे मिळालेल्या बातमीचे ठिकाणी जावुन सापळा रचुन बातमीतील नमुद वर्णनाचा तडीपार इसम हा त्याचे रहाते घर फ्लॅट नं २, गणराज सहकारी गृहरचना सहकारी संस्था मर्यादित बिल्डींग, विटभट्टी शेजारी, पाषाण, पुणे येथे एका मोपेड गाडीसह उभा असलेला दिसल्याने तो अधिकारी व स्टाफ यांना पाहुन पळुन जावु लागल्याने लागलीच अधिकारी व स्टाफ यांनी मिळुन त्यास ताब्यात घेवुन त्यास नाव, पत्ता विचारता त्याने त्याचे नाव, पत्ता **सोहम प्रकाश डोंगरे, वय- २४ वर्षे, सध्या रा. गणराज सहकारी गृहरचना सहकारी संस्था मर्यादित बिल्डींग, फ्लॅट नं २, विटभट्टी शेजारी, पाषाण, पुणे व मुळ रा. स.नं. ०१, पाषाण भाजी मंडई समोर, सहानी इलेक्ट्रॉनिक दुकानासमोर, सावकार चाळ, संभाजी चौक, पाषाण गाव, पुणे** असे असल्याचे सांगितले. तसेच वरील नमुद तडीपार इसमाचे ताब्यात मिळुन आलेल्या मोपेड गाडीचा नंबर हा बनावट असल्याचा संशय आल्याने नमुद मोपेड गाडीचे चॅसि नंबर वरुन माहिती घेतली असता नमुद मोपेड गाडीचे कागदपत्रांबाबत विचारणा केली असता सदरची मोपेड गाडी ही त्याने चोरी केल्याचे निष्पन्न झाल्याने नमुद मोपेड गाडीबाबत माहिती घेतली असता **वाकड पोलीस स्टेशन, पिंपरी-चिंचवड आयुक्तालय येथे गुन्हा रजि नं ७०८/२०२३, भादंवि कलम ३७९ अन्वये** गुन्हा दाखल असल्याचे समजले. सदरची मोपेड गाडी **किं.रु. ४५,०००/-** असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन सदर इसमाविरुध्द **चतु :श्रुंगी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि नं १००/२०२५, महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम १४२ अन्वये** गुन्हा नोंद करुन पुढील कारवाईकरीता चतु:श्रुंगी पोलीस स्टेशन, पुणे शहर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. शैलेश बलकवडे, मा. पोलीस उप आयुक्त (गुन्हे) श्री निखिल पिंगळे, मा. सहा.पोलीस आयुक्त श्री. गणेश इंगळे, गुन्हे शाखा १, पुणे शहर व दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नंदकुमार बिडवई यांचे मार्गदर्शनाखाली सहा.पोलीस निरीक्षक प्रविण काळुखे, पोलीस अंमलदार गणेश ढगे, अजित शिंदे, रविंद्र लोखंडे, अमित गद्रे, महेश पाटील,नारायण बनकर यांनी केली आहे.